**जनसंपर्क अधिकारी, पोलीस आयुक्तालय,**
**ठाणे शहर**
इमेल-cp.thane.pro@mahapolice.gov.in
**मो.क्र.9819208279**

**प्रेसनोट** **दिनांक २९.०१.२०२५**

# ‘‘ बांग्लादेश येथून भारतात घुसखोरी केलेल्या ०४ महिला बांग्लादेशी यांना उथळसर येथुन अटक ’’

अनैतिक मानवी वाहतुक प्रतिबंध कक्ष, गुन्हे शाखेच्या वपोनि/श्रीमती चेतना चौधरी यांना माहिती मिळाली की, उथळसर प्रभाग समिती कार्यालय मागे, मनोर पाडा, टी.एम.सी. पुनर्वसन चाळ, ठाणे पश्चिम येथे बांग्लादेश येथून भारतात घुसखोरी केलेले काही नागरिक कोणतेही अधिकृत कागदपत्रे नसताना भारतात अवैधरित्या प्रवेश करून वास्तव्य करीत आहेत.

सदर बातमीची खात्री व पाठपुरावा करून लागलीच अनैतिक मानवी वाहतूक प्रतिबंध कक्षाच्या वपोनि/श्रीमती चेतना चौधरी यांनी एक पथक स्थापन करून दिनांक २८.०१.२०२५ रोजी १६.५५ वा. उथळसर प्रभाग समिती कार्यालय मागे, मनोर पाडा, टी.एम.सी.पुनर्वसन चाळ, ठाणे पश्चिम या ठिकाणी सापळा रचुन ०४ बांग्लादेशी महिला नामे १) शाजिदा जहीरूद्दीन खातुन, वय ३८ वर्षे, मुळ रा.बामनखली, ठाणा-कालारोआ, जि.सातखिरा, ढाका, बांग्लादेश २) शालीना मलिक मुल्ला, वय ५० वर्षे, मुळ रा. ग्राम हिजालती, ठाणा-खुंलना, जि.सातखिरा, ढाका, बांग्लादेश ३) रत्ना खोजदिलबिरोश खातुन, वय ४० वर्षे, मुळ रा.ग्राम अग्रभ्रत भुलट (दक्षिणपारा) पोस्ट गोगा, जि. जैसोर, ढाका, बांग्लादेश ४) रेश्मा शहाजहान ढाली, वय ४० वर्षे, मुळ रा.ग्राम रूद्रपुर, ठाणा शश्या, जि.जैसोर, ढाका, बांग्लादेश यांना ताब्यात घेवुन त्यांच्याकडे भारतीय नागरीकत्वाविषयी कागदपत्राची मागणी केली असता त्यांच्याकडे कोणतेही वैध कागदपत्रे नसल्याचे त्यांनी सांगितले. तसेच त्यांच्याकडे भारतात येण्यासाठी लागणारे प्रवासी वैध कागदपत्रे नसल्याचे व त्यांनी अवैध मार्गाने भारत-बांगलादेश सिमेवरून लपत-छपत भारतीय सरहद्दीमध्ये प्रवेश करून राबोडी पोलीस ठाणेच्या हद्दीत विनापरवाना भाडे तत्वावर रहात असल्याचे सांगितले.

सदर दोन्ही इसमांविरूध्द राबोडी पोलीस ठाणे येथे गुन्हा रजि.क्र.। ७०/२०२५ पारपत्र (भारतात प्रवेश) अधिनियम १९२० चे कलम ३,४ विदेशी व्यक्ती अधिनियम १९४६ चे कलम १३, १४(अ), १४(ब) तसेच घरमालक आरोपी नितीन कोंडीलकर याने त्याचे मालकीचे घर आरोपीत यांना त्या बांग्लादेशी आहेत हे माहित असताना देखील भाडयाने दिले म्हणून त्याचेविरूध्द विदेशी व्यक्ती अधिनियम १९४६ चे कलम ७, १४ (क) प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला असुन दोन्ही बांग्लादेशी महिला आरोपींना अटक करण्यात आली आहे.

सदरची कारवाई श्री.अमरसिंह जाधव, पोलीस उप आयुक्त ( गुन्हे ), श्री.धनाजी क्षिरसागर, सहाय्यक पोलीस आयुक्त (प्रतिबंध) यांच्या मार्गदर्शनाखाली अनैतिक मानवी वाहतूक प्रतिबंध कक्ष, गुन्हे शाखेच्या वपोनि/श्रीमती चेतना चौधरी व त्यांचे पथकाने यशस्वीपणे पार पाडलेली आहे.

( शैलेश साळवी )
वरिष्ठ पोलीस निरीक्षक तथा जनसंपर्क
अधिकारी, पोलीस आयुक्तालय,
ठाणे शहर